| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | **पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**<br>**प्रेसनोट** | 2025<br>CB/ 26/2025 |
| **गुन्हे शाखा, नवी मुंबई** | | **दिनांक १४.०५.२०२५** |

**''अवैद्य बांगलादेशी नागरीकांना बनावट पासपोर्ट व जन्मदाखले बनवुन देणा-या आरोपीस व इतर ०२ अवैद्य बांगलादेशी नागरीकांना गुन्हे शाखेकडुन अटक''**

---

श्री. मिलींद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री. संजय येनपुरे, पोलीस सह आयुक्त, श्री. दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अवैधरित्या राहत असलेल्या बांगलादेशी नागरीकांवर कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

दिनांक ०५/०५/२०२५ रोजी केलेल्या कारवाईमध्ये ०२ पुरुष व ०३ महिला यांचेवर पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि नंबर २३१/२०२५ पारपत्र (भारतात प्रवेश) १९५० कलम ३(ए)सह ६(ए), व विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १४(अ) सह बीएनएस कलम ३१८(४), ३३६(२), ३३६(३), ३३८, ३४०(२) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा पुढील तपास अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई करत आहे.

वर नमुद गुन्हयातील बांगलादेशी नागरीकांना भारतीय कागदपत्र बनवण्याकरीता व भारतात वास्तव्य करण्याकरीता मदत करणारा सह आरोपी नामे मोहम्मद इस्माईल अमिन्नोदीन येरूलकर, वय ५२ वर्ष,धंदा-रिटार्यर्ड,सध्या राहणार रूम नं ६०७, ०६ माळा, प्लॉट नंबर ९३, ब्ल्यु क्रिश सहकारी गृहनिर्माण सोसायटी, सेक्टर ०६, करंजाडे, पनवेल, रायगड यांने वरील बांगलादेशी नागरीकांचे बनावट **पासपोर्ट व जन्मदाखले ईस्माइल शेख यांच्यामार्फत कलबुर्गी कर्नाटक राज्य येथे बनवल्याचे सांगितले. त्यावरून कलबुर्गी, कर्नाटक राज्य येथे सपोनि/देशमुख व पोलीस पथक पाठवले असता,** बनावट जन्मदाखले बनविणारा **इसम नामे ईस्माईल शब्बिर मिया शेख यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे तपास केला असता, त्याने पासपोर्ट तयार करण्यासाठी जन्मदाखले बनवुन दिल्याचे सांगिल्यावरून त्यास नमुद गुन्हयात दिनांक ०७/०५/२०२५ अटक करण्यात आली आहे.**

वर नमुद गुन्हयातील बांगलादेशी अटक महिला आरोपी हिच्याकडे तिचे इतर नातेवाईक भारतात कोठे वास्तव्यास आहेत काय ? याबाबत तपास केला असता तिचे आई व भाऊ हे मिरा भाईंदर,ठाणे येथे वास्तव्यास असलेबाबत माहीती प्राप्त झाल्यावरून त्याठिकाणी सपोनि/पाटील व पथक यांना रवाना केले असता, आरोपीचा लहान भाऊ नामे राहूल उर्फ मिकाईल ईस्माईल गाझी व त्याची आई नामे सुफियाबेगम ईस्माईल गाझी, दोन्ही सध्या राहणार रूम नंबर १५, चीताड गंढ बी, को. ऑ. हौ. सोसायटी, खरीगांव, भाईदर ईस्ट, ठाणे येथे मिळुन आले. त्यांना ताब्यात घेवुन चौकशी केली असता,ते मुळ राहणार मुळ गाझीपुर थाना- बेनापुल, जिल्हा-जोशोर, बांगलादेश येथील असल्याचे तपासात निष्पन्न झाल्यावरून सुफियाबेगम ईस्माईल गाझी हिच्या विरोधात सन २०१२ मध्ये विशेष शाखा, आय ब्रँच, मुंबई यांनी गुन्हा दाखल असुन तिच्या विरोधात मा. न्यायालयाने अजामीनपात्र वॉरंट काढले असल्याबाबत माहीती मिळाली. त्याबाबत विशेष शाखा, आय ब्रँच, मुंबई यांना माहीती दिली आहे. **राहूल उर्फ मिकाईल ईस्माईल गाझी यास दिनांक ११/०५/२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे.**

**वरील आरोपी यांना मा. न्यायालयाने दि.१३.०५.२०२५ रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला होता. आज रोजी वरील आरोपीतांची पोलीस कस्टडी रिमांड संपल्यामुळे मा.न्यायालयाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.**

सदरचे कारवाई मध्ये अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.अमित काळे, सहा पोलीस आयुक्त , अजयकुमार लांडगे, गुन्हे शाखा, नवी मुंबई व सहा. पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे ,AHTU , गुन्हे शाखा, वपोनि/ पृथ्वीराज घोरपडे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस पथकामध्ये पोउपनि/ सरिता गुडे, सपोनि योगेश देशमुख, सपोनि अलका पाटील पोहवा/मांडोळे, पोशि/ चव्हाण, पोशि/ ठाकुर, पोशि/ कोलते, मपोहवा/ धोणसेकर, मपोहवा/ म्हात्रे, मपोहवा/ अडकमोल, चालक पोहवा/हांडे, पोशि/ पाटील, मपोना/ भोये, पोशि /पारासुर हे सहभागी होते.

नवी मुंबई पोलीसांकडुन सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येत आहे की,‘‘कारवाई दरम्यान बांगलादेशी नागरीक यांना पडताळणी न करता घर भाडयाने दिल्यास, कामासाठी ठेवल्यास संबधीत घरमालक, बांधकाम व्यवसाईक किंवा परदेशी नागरीकांना मदत करणारे इतर व्यक्ती यांच्यावर परकीय नागरीक कायदा कलम १४ ( क ) तसेच रजिस्ट्रेशन ऑफ फॉरेनर्स ॲक्ट १९३९ कलम ५ अन्वये कारवाई करण्यात येवुन त्यांना सहआरोपी करण्यात येणार आहे.’’

★★★★★★★★★★